# नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
## बृहन्मुंबई

जा.क्र.उसंनर/बृमुं/कलम ३७(१अे)/३३(९)/ १६८

इन्साहटमेंट ई ब्लॉक,
आझाद मैदान, महापालिका मार्ग
मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०९३१
Email ID:- ddtpgr_mumbai@rediffmail.com
दि. २८/०१/२०१४.

**प्रति,**

श्री. एस.एस.हुसेन, माजी आय.ए.एस.,
चीफ एक्झीक्युटिव्ह ऑफिसर,
महाराष्ट्र चेम्बर ऑफ हौसिंग इंडस्ट्रि,
मेकर भवन-II, ४ था मजला,
१८, व्ही.ठाकरशी मार्ग, न्यु मरीनलाईन्स, मुंबई-४०००२०.

**विषय : महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३ (९) मध्ये प्रस्तावित फेरबदलाबाबत कलम ३७ (१ अेअे) खालील सुचना.

**संदर्भ :** १) शासन नगर विकास विभागाकडील सूचना क्र. टिपीबी-४३१३/प्र.क्र.१८५/२०१३/नवि-११, दि. २७/१२/२०१३.
२) आपले दि. २३/०१/२०१४ रोजीचे पत्र.

३१/१/१४
Kvadhar.

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची दि. २७/१२/२०१३ रोजीची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - कोकण विभागीय पुरवणी डिसेंबर ३०, २०१३ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे) मधील तरतुदीनुसार सदर सूचना प्रसिध्द करण्यांत आली आहे. शासनाने उपरोक्त सूचनेद्वारे उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना कलम ३७ (१अेअे) च्या तरतूदीचे पालन करण्याचे विषयांकित प्रकरणी निर्देश दिले आहेत.

शासनाने निर्गमित केलेल्या संदर्भ क्र.१ मधील सूचनेच्या अनुषंगाने विषयांकित फेरबदलासंबंधी आपणाकडील हरकत/सूचना पत्र संदर्भ क्र.२ नुसार या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्यानुसार आपणांस उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई हे सुनावणी देणार आहेत. तेव्हा **दि.२०/०२/२०१४ रोजी दुपारी १२ ते ५ वाजता वाजता उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, कार्यालय इन्साहटमेंट, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१** येथे सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे, ही विनंती.

**आपला,**

**उपसंचालक,नगर रचना,**
**बृहन्मुंबई.** याचकरीता.

दसंउ/२७११४